# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (आस्थापना विभाग)

जाहिरात क्र./1133/पी.आर दिनांक:-23/०३/२०२६

# थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिकेत सार्वत्रिक निवडणुक झालेल्या असुन मा. महापौर व स्थायी समिती सभापती याचे पदग्रहण झालेले आहे त्यांना त्यांचे कार्यालयात प्रशासकीय कामांकरिता महाराष्ट्र शासकीय /निमशासकीय सेवेतील वर्ग – १ किंवा २ या पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांना खालील नमूद कामाचा अनुभव व पात्रता असलेल्या अधिकाऱ्याची आवश्यकता असल्यामुळे " कंत्राटी विशेष कार्य अधिकारी महापौर कक्ष " व “कंत्राटी विषेश कार्य अधिकारी स्थायी समिती” या पदावर कंत्राटी तत्वावर शासन निर्णय दि. १० जुन , २०२५ नुसार अनुज्ञेय मासिक पारिश्रमिक तत्वावर प्रथमतः ६ महिन्याच्या कालावधीकरिता खालील नमुद अटी व शर्तीवर नियुक्त करावयाची आहे.

त्या करिता पात्र सेवानिवृत्त इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरिता आवश्यक कागदपत्रांसह दि.२५/०३/२०२६ रोजी सकाळी १०: ३० वाजता, अति. आयुक्त (सामान्य), सिव्हील लाईन्स, म.न.पा. नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ. क्र | पदाचे नाव | एकुण पद | वयोमर्यादा | पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | कंत्राटी विशेष कार्य अधिकारी महापौर कक्ष | ०१ | ६५ वर्षापेक्षा जास्त नसावी | १) महाराष्ट्र शासकीय /निमशासकीय सेवेतील वर्ग – १ किंवा २ या पदावरून सेवानिवृत्त झालेले व अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>२) कोणत्याही शाखेचा पदवीधर<br>३) महापौर किंवा समकक्ष कार्यालयात प्रशासकीय काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| २ | कंत्राटी विषेश कार्य अधिकारी स्थायी समिती | ०१ | | १) महाराष्ट्र शासकीय /निमशासकीय सेवेतील वर्ग – १ किंवा २ या पदावरून सेवानिवृत्त झालेले व अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>२) कोणत्याही शाखेचा पदवीधर<br>३) स्थायी समिती किंवा समकक्ष कार्यालयात प्रशासकीय काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य. |

वरील पदाकरिता इच्छूक उमेदावारांनी दि.२५/३/२०२६ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० पर्यंतच्या दरम्यान आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांच्या नावाची नोंद करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**अटी व शर्ती :-**

१. सदर पदाची नेमणूक ही पूर्णतः कंत्राटी पद्धतीने असेल.
२. या पदावरील अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.
३. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दिलेल्या प्रपत्रात / नमुन्यात भरून थेट सादर करावेत. इतर प्रपत्रात / नमुन्यात सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

Scanned with OKEN Scanner

४. शासन निर्णय दि. १० जुन, २०२५ मध्ये शासकीय/निमशासकीय सेवा सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मुळ निवृत्तीवेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे) कायम राहील.

५. वयोमर्यादा विचारात घेतांना थेट मुलाखतीची तारीख ग्राहय धरण्यात येईल.

६. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा मानधनापोटी होणारा खर्च सचिवालय विभागाच्या व्यय पद क्र **A20002510009** मधुन राहील

७. उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती स्वसांक्षाकित करुन जोडाव्यात.

८. उमेदवारांनी अर्ज सादर करुन अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

९. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीशी राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र १००रू/- च्या स्टॅम्प पेपरवर त्यांच्याकडून घेण्यात येईल. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र/हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.

१०. करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

११. स्वत:चे वाहन वापरावे लागेल आणि त्याचे कोणतेही खर्च मनपा व्दारा अनुज्ञेय राहणार नाही.

१२. उमेदवारांनी निवड प्रक्रिये दरम्यान नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वरील सुचनांची नोंद घ्यावी. तसेच इतर कोणत्याही मार्गाने सुचना देण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१३. मुलाखती अंती प्राप्त गुणानुसार गुणवत्ता यादी व प्रतिक्षा यादी मनपाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येवून त्यानुसार आदेश निर्गमित करण्यात येईल.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता / अटी / शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

**(मा. आयुक्त यांचे मान्यतेने)**

श्याम कापसे
सहा.आयुक्त (साप्रवि)
महानगरपालिका, नागपूर

दिनांक :- / /२०२६

Scanned with OKEN Scanner

# अर्जाचा नमूना

१. पदाचे नाव :- ..................................................................................

२. अर्जदाराचे नांव :- ..................................................................................

३. पूर्ण पत्ता :- ..................................................................................

..................................................................................

भ्रमणध्वनी क्रमांक :- ..................................................................................

ई-मेल आय डी :- ..................................................................................

४. जन्म दिनांक :- ..................................................................................

५. दि. / /२०२६ ला वय :- ..........................................................................

६. उमेदवारांचे जात व जातीचा संवर्ग :- ..........................................................................

७. सेवानिवृत्तीचे वेळी धारण
केलेले पद व कार्यालय :- ..................................................................................

८. शैक्षणिक पात्रता :- ..................................................................................

९. अ) सेवाकाळातील विभागीय
चौकशी सुरु आहे/ होती काय ?
ब) असल्यास विभागीय चौकशीत
शिक्षा झाली होती का ?
क) अर्जदारा विरुध्द कोणताही
गुन्हा दाखल आहे का ?
ड) गुन्हा दाखल असल्यास गुन्हाबाबत तपशील

९. अनुभवाचा तपशील :- ..................................................................................

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेल्या पदाचे नाव | कालावधी (पासून-पर्यंत) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

स्वाक्षरी

Scanned with OKEN Scanner